GRAND ACADEMIC PORTAL
RESEARCH JOURNALS

GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

# निंदण

**बालाजी ग्यानोबा कांबळे**

(सहायक प्राध्यापक)
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल)
मुंबई विद्यापीठ,मुंबई

नांगपंचमीचा सन होता .. खायला कुणाच्याच घरात धान्यचा कण नव्हता .. मायला चिंता लागली होती , काय करावे ,.. या माझ्या चिमण्याला कुठून धान्य आणून भरावे .. या चिंतेत माय .. होती बाहेर तर पंचमीची झड .. लागली होती . कुणालाही घरच्या बाहेर पाऊस निघू देत नव्हत..? , आभाळ सर्वत्र काळाकुठ झाला होता , वीज गर्जना करून साऱ्याना घाबरवत होती , मायला वाटल .. हा नक्कीच माझ्या चिमण्याला सनाच उपाशी ठेवणार ....? म्हणून पुनः पुन्हा झोपडीतून डोक काढून माय .. पाहू लागली, .. एकदाचा आभाळ कधी निवळेल .. याची वाट पहात होती , लोकांच्या वावरात , पिकं आणी तणाला उत (शेतीत गवत वाढलेले ) .. आल होत , ही झड गेली की, भरपूर निंदण लागल .. पण आजचा दिवस कसं जाईल हाच विचार माय करत होती , तेवढ्यात आमची छोटी आझी ,संता,मोठी आली .. ये .. जना .. काय करतीस .. देशाईच निंदण हाय .. म्हण .. जाऊत काय ..? बघायला .. संता आझी म्हणाली .. आई माय आत्या, काय मनातल बोलल्या ,.. माय ..मी तेच वाट बघत होती .. काय सण.. हाय .. पंचमीचा .. आत्या ..! चोळी, .. कांकण हाय .. बाईलेकीला देयाच ,घरात काहीच नाही काय ..कराव , लेकरायला काय सणाच उपाशी ठेवायच का, ..? चला ..! जाऊन येऊत ..! वाड्यावर ,देशाई हाय .. का.?
संता आझी म्हणाली, “नाही मला माहीत नाही माय .. कोळयाच्या जमादारला पुसाव.. लागल .. हाय का नाही तेईला .. माहीत असेल बघ .. मायन .. लगेच तयार झाली .. चला .. जाऊन येऊत .. घरात अश्या झडीत बसलो तर .. लेकराला ,सण .. खायाला.. मिळणार नाही .. चला .. पटकन जाऊन येऊत .. म्हणून माय आणी संता आझी दोघी .. डोक्यावर पोत्याचा घोंगता .. करून घेतली आणी .. म्हणाली .. बापू घरातच बसा .. आत्ता आलो मी .. म्हणून माय आणी आझी भर पावसात निघाली .. कोळयाच्या घराकडील वाट .. फार अवघड होती साऱ्या गावाच पानी त्याच्या घराच्या समोरून जात होत .. मागुडयाला लागून .. कैकाड्याची भली मोठी झोपडी त्यातच शेळ्या , जनावर , डुकर .. व त्याची पिल.. या सर्व प्राण्यांचा समावेश त्यांच्या पावसातील चित्र विचित्र आवाज , सर्वत्र घाणीच साम्राज्य होत ,त्यांच्या झोपडीत हातभट्टी विकायचे .. अश्या ठिकाणाहून ती वाट होती ..त्यातून नाकाला पदर धरून .. माय आणी आझी .. त्या हगंणदारीतून वाट काढत .. जमादारच्या घरी निघाल्या होत्या , आमच्या मांग महार वाडयातील लोक त्या कैकाड्याच्या झोपडीवर हातभट्टी पिण्यासाठी जात .. असत .. तेवढ्यात एका ओळखीचा आवाज मायच्या कानी आला .. कोण हाय .. ते व्हळाला .. पानी आलंय .. ए .. बाय.. हो .. व्हळच पाणी .. मज्जीतीला आलंय .. कुठ निघाल्या .. तोंड वर करून .. माय घाबरली .. आझी म्हणाली .. तू .. कोण र.. भाडया .. पित बस तू मुताड .. माझी संता आजी..! म्हणजे जणू जळती तोफच .. निर्भीड मनांची स्वाभिमानी , सडेतोड बोलणारी .. कोण तू मऱ्या .. काय र .. बोल की , जमादारच्या घराकड जात्याव र ..! काय झाल एवढ .. मऱ्या .. शरमेण मान .. खाली घालून .. अई .. च्या भणी.. तू हाईस.. होय, ..? संता माय .. म्हणून .. जा .. जा .. आय .. एवढ्या चिखलात .. व्हळाला पानी आलया .. म्हणून हटकिलो .. माय...? हाईत जमादार घरी जावा ..! पावसाची .. रिपरीप .. चालूच होती .. ढगाचा कडकडाट होता , जमादार चुलीत लाकड .. घालत बसला होता , जमादारची बायको .. भाकऱ्या थापटत होती , आजी ,sss .! . आवाज दिला .. जमादार .. आजी वसंत जमादार .. जमादार .. आवाज देताच .. जमादार बाहेर आला .. काय .. झाल संताबाई या .. म्हणून .. समोर बसलेल्या म्हशीच्या वंटराला ..! उठवला .. जमादारांच्या घरात .. धू.. झालं होता कोणाच कोणाला तोंड दिसत नव्हत .. मायन.. आझीला .. खुणावल .. विचारा .. जमादाराला .. जमादार गोंधळात पडला .. काय .. झाल हाय .. बोल की, संताबाई .. आझी बोलली .. अई .. काही नाही .. देशाईच निंदायच .. हाय .. की, म्हणून विचारायला आल्या , होत्या बापू .. नकर .. सांगा .. आम्ही गुत्त घेऊन काडत्या .. .. तो चकित झाला .. काय निंदायच .. आणी पाऊस लागल की , ह्या झडीत कस लावील .. निंदायाला ..?संता आझी

https://www.gapbhasha.org/

म्हणाली , ............. आजी .. बापू .. सण हाय .. दोन दिवसापासून घरात काही नाही तव्हा तुम्ही देशाईच्या कानावर टाकून या काही तरी उचल .. देयाला.. पाऊस उघडल्यावर बक्कळ निंदण लागतील , तव्हा .. माणसं मिळणार नाहीत .. उदयाला काही तरी उचल देयाला सांगा ..? संताआजी ची गोष्ट जमादारास पटली .. व्हय की, निंदनांच्या सीजन मध्ये कुठ माणसं मिळतात .. म्हणू लागला .. बर .. उदयाला काही तरी उचल घेऊन येतो .. असे जमादार बोलला .. मायला आणी आजीला मनातून खूप आनंद झाला . आता आपल्या नाग पंचमीची सणाची व्यवस्था झाली , माय .. चल आता म्हणून दोघी निघाल्या .. माय मध्येच बोलली .. जमादार .. उद्या येत्याव आम्ही पानी काही लागून राहणार नाही .. जमादार बोलला .. ह.. या .. घेऊन येतो . उचल पण ऐन यलाळा , धोका देऊ नका .. सगळी आसामी देतो , निंदायाला ..(खुरपणी)असा बोलला .. आजी म्हणाली .. नाही .. जी .. खालेल्या मीठला बाइमान होणार नाही जी .. नाही ए .. बाई माझ्या काय ..? घरच देयाच .. हाय .. ! तुमच तुम्ही ईमानदारीने तेवढी देशाईची आसामी काढा .. बस्स ..! नाही बापू .. काढत्याव .. म्हणत माय आणी आजी मागारी निघाल्या ..?

माय व आजीचा आनंद गगणात मावेनासा झाला. त्याना काही तरी मोठ काम केल्या सारखं वाटू लागल भर पावसात गेल्याच काही तरी चीज झालं होत .. अगदी तोंडावर आलेला पंचमीचा सण .. सुखं समाधानात जाईल .. ही आपल्या बाई -लेकीला चोळी काकण , होईल .. या विचारात दोघी ही मग्न झाल्या होत्या .. आणी कवा एकदा सकाळ होईल याची वाट पहाट होत्या .. संध्याकाळच स्वयपाक आटोपला .. माझ्या मोठ्या बहीणीने अगोदरच तांदळाची कणकी चुलीवर ठेवली होती , मला आस झालं होत कवा एकदा माय घरी येईल आणी , नवीन काम मिळाल्याची खबर देईल .. आस झालं होत .. कारण घरात काहीच खायाल नव्हत .. माझा छोटा भाऊ .. भूक लागली म्हणून रडत होता .. ? माय आली सार विश्व आल्यासारख वाटल मायन पायावर पानी घेतली , मी घरातील मोठा असल्यामुळे मला सार समजत होत , मायचा चेहरा आनंदीत होता , म्या .. मायला घरात येण्याच्या अगोदरच विचारल.. काय .. म्हणाले माय .., जमादार .. काय र .. बापू म्हणून मायन माझ्याकड पाहून .. काय ..? सांगू बापू .. तुझा बाप राहिला आसता म्या कशाला .. गेले असते .. काढलो बापू हुडकून काम सार लोक घरात बसल्यात..! मला कस बसाव वाटल .. उदयाला या म्हणला .. पैशाला .. काही नाही तर उद्याचा सण तर होईल .. ! मायचा हा शब्द ऐकण्यासाठी माझे कान आतुरतेने वाट पहाट होते , मला ही समाधान वाटल .. मी मायला म्हणालो माय या गुत्यात , कोणालाही घेऊ नको .. आपणच हा गुत्ता .. काढू माय..! माझ्यावर ओरडली .. उग .. बस .. ! लई कामाचा हाईस.. तुला मी निंदायला घेऊन जाऊ काय ? “काय तुझं तोंड हाय बापूच” .. आर .. निंदून / खुरपून कोण पुढ गेल र...! बापू .. शाळा नकर ध्यान देऊन शिक र.. तू या गोष्टी कड ध्यान देऊ नको .. ! आर .. ही पोटाची आग बुजवण्यासाठी आम्हाला कराव लागत रे ..! माझ्या लेकरा .. माय, काय.. , काय , करते हे टीचभर पोट भरण्यासाठी हेच तू ध्यानात ठेव ..! आणी शाळत तू सगळ्यात पहिला नंबर ये .. तुला काम करण्याची गरज नाही .. कळल .. उग म्या लेकरच्या पोटाला घालण्यासाठी.. आर .. ही , पोटाची आग विझवण्यासाठी जातो बापू आमच्या नशिबी शिक्षण नव्हत, म्हणून ही येळ माझ्यावर आली ..? पण माझ्या या चिमण्यावर ही वेळ येऊ देणार नाही .. ! माय स्वत:शीच मनाला बोलत .. बसली .. हे दिवस आज ना उद्या जातील .. काम केल्यान काय ..? माणूस मरणार हाय .. ! मला देवाण सुखी... ठेवाव कुठूनही काम .. उकरून काढून या माझ्या चिमण्याला भरवण्याची ताकत हाय ..! असे म्हणू लागली .. मी मायला म्हणालो .. माय देशाईची सारीच आसामी दिलेत की, निंदायला.., मायन म्हणाली .. ह.. ह . सगळीच , बर झालं बापू आम्ही पावसाचा विचार न करता गेलो म्हणून भेटल .. ते तरी ,नाही तर .. “लाल्या ,मामा चा मारती बाबाजी , तिथच होता , वाटत भेटला ही ..! कुठं निघाल्या .. भाबी , म्हणून ही हटकावला .. त्याला काही न बोलताच आम्ही ऐकूण न ऐकल्यासारख करून पुढ गेलो काय कराव त्यान बी मधी मिसळल म्हणून पुढ गेल्या आम्ही ते कोण सनी माग लाऊन घेईल.. मायन हसून म्हणाली ..

चुळीवरील “कंनकीचा भरडा” खद .. खद..! करीत शिजला होता , मायन आम्हा सहा भावंडांना जवळ घेतलं .. चला र.. बापू या सगळे आजच्या दिवसाला भरडा खाऊ उदयाला मस्त पैकी भाकरी करू मला ही लई यळ झाली यायला ! .चल ..उठा ..! म्हणताच, आम्ही भरडा खायाला.. बसलो सगळ्यांच्या ताटात मायन .. भरडा वाढला .. आणी त्याच्या सोबत एक एक गुळाचा खडा दिला .. घरात तांदूळ नसल्यामुळे कमी तांदळात भरपूर पाणी टाकून भगोण - (पातेल ).. भरून केल तर सर्वांना पुरेल म्हणून .. भरडा दररोज संध्याकाळी असायचा ते खाऊन फार कंठाळा आला होता . पण आम्हचा ना विलाज होता , माझ्या छोट्या भावाला काहीच कळायच नाही तो दूध म्हणून फार आवडीने खायाचा , कसं बस .. संध्याकाळचा भरडा आम्ही खाऊन घेतलं .. मायन ही थोडस ताटात वाढून घेतली .. काही तरी या गारीला

https://www.gapbhasha.org/

भरवाव लागत .. म्हणत .. थोडासा भरडा पिऊन घेतली. आणी सकाळची वाट पाहत अंथूरणात पडली .. आम्ही पण सारे भावंड . कसलाच विचार न करता निवांत झोपी गेलो ,सकाळ कधी झाली आम्हाला काळालीच नाही . मायन सकाळची पारशी काम पटा .. पट आवरून घेतली .. आज नाग पंचमी हाय .. बाजारात जाव लागेल काही तरी चोळीचे खण .. बाईलेकीला द्याव लागत .. म्हणून मायन सकाळची काम लवकर आटोपून संता आजी कडे जाण्याचा मायचा बेत होता. कारण कोळयाच्या जमादारच्या घरून निंदणाचे उचल..! पैसे, आणून सण साजरा करायचं हाय घरात काहीच नाही . या चिंतेने .. मायला रात्रभर झोपच आली नाही. ,मायन सार काम करून सकाळी जमादारांच्या घरी पोहचली .. जमादार बिचारा त्याला ही परिस्थितीची चांगलीच जाणीव होती . त्यान देशाईकडून निंदनाच्या नावाने रात्रीच पैसे मागून ठेवले होते , मायन .. कसलाच विचार न करता काम करण्याच्या अगोदर पैसे घेण्यासाठी गेली असता , जमादार मायला पाहताच .. हसत म्हणाला ..!आणलो .. आणलो .. काय .. बाई तुमची पोळी पिकली म्हणू लागला , का ..? जी .. बापू .. कशाची पोळी .. आय ह्या झडीत कोण पैसे देतो ? जमादार म्हणाला. ही पाण्याची झड .. बंद झाल्यावर सारी , आसामी काडावी लागते ,बापू तुम्ही आमची यळ भागावल्यात .. बर झाल..! आमच्या लेकरांबाळाचा आशीर्वाद मिळल जी..! म्हणून मायन भर पावसात उद्याच्या कामाची अंगावर उचल घेऊन आली होती , जमादाराने देशाईकतून १००० एक हजार रु. आणले होते , त्याच्याकडून पैसे घेतले आणी संता आजी आणी माय दोघी पाचशे पाचशे रुपये वाटून घेतले .. आमच्या घरात त्या पाचशे रुपायांमुळे नागपंचमीचा सण अतिशय उत्साहात होणार होता यामुळे सर्वांना आनंद झाला होता . आम्हाला जगात श्रीमंत झाल्या सारखं वाटल .. बाजारातून सर्वांना कपडे , चोळी - काकण खरेदी कली . पुरण पोळी साठी लागणारी हरबऱ्याची डाळ , गूळ,तांदूळ ,या घरातील सारी धान्य खरेदी केली ..असं वाटायला लागल...... .आमच्या घरी आता सर्व सुख आले असा भास होऊ लागला . मायन मात्र जिवाची बाजी लाऊन सण साजरा करण्याचा जणू चंगच बांधला होता.खर पहिल तर आमच्या घरी सणाच्या दिवशीच आम्हाला भात खायला मिळायच,.. नेहमी ज्वारीच्या कन्या , नाही तर कणकी तांदळाचा पातळ भात .. पण सण आला की, मन भरून यायच मायन काही ही मेहनत करून सणाची पुराण पोळी मात्र आम्हा भावंडाला भरवायची ..सकाळ झाली मायन सकाळची काम केली , आम्हा भावंडाला मायन उठवली.. सण आहे म्हणून आम्ही सकाळी लवकरच उठलो होते , सगळ्यांची आंघोळ झाली .. मी आणी माझी मोठी बहीण .. नागाला दूध घालण्यासाठी निघालो .. माझ्या मनात एकाच विचार येऊ लागला .. मी माझ्या मोठ्या बहिणीला विचारल आक्का या हुतात नाग राहते का ? म्हणून विचारलो आक्का म्हणाली , गप बस .. देवाला तस म्हणू नये .. म्हणाली , मला ही खर वाटल .. मी पुन्हा विचारलो .. ते दूध पिते काय ..? आक्का म्हणाली .. नाही देव कधी काही खात पित नाही .. माझा छोटा भाऊ बोलला .. नाही खात तर चल कशाला देयाचं मग.. हे निव्वद ,,,,.. आम्ही सारे त्याला हसलो .. पण त्याच्या त्या निरागस मनाला काय माहीत .. की ,मुळात देवच अस्तित्वात नाही ते , पण माझ्या मायच पण तीच गत प्रत्येक सणाला देवाची पूजा करण्यासाठी जीवाचा आटा पिटा करून का होईना .. पण सण साजरा करून आमच्यात आनंद निर्माण करत होती , आपल्या मुलाला काही ही कमी पडू नये , कोणाच्याही तोंडाला माझे लेकर पाहू नये म्हणून माय सर्वा बरोबर सण साजरा करत असत ..

नागोबाची नेमाप्रमाणे पूजा केली , मायन चुळीवर हरबऱ्याची डाळ ठेवली .. एका चुलीवर भात ठेवला, डाळ शिजत आली मायन ती चुली .. वरून उतरून घेतली .. आणी उकळात टाकून कुठून घेतली .. त्यात विलायची , सोप .. टाकली त्यामुळे पुरणाचा ज्यास्तच घरात सुगंध येऊ लागला.माझा छोटा भाऊ तर चुलीच्या भोवताली फिरत .. मायला पूरण खाण्यासाठी दे म्हणून मागू लागला .. मायन आमच्या हातात एक एक पुरणाचा मूठका करून दिला , बाजूला शेजारच्या बाई लेकिन भुलईचा खेळ मांडला होता आम्ही हातात पूरण घेऊन भुलई ..पहाण्यासाठी गेलो भुलई ..! चालू झाली , .. आमच्या चुलत्याच्या मुलीला रुक्कमीनबाईला भुलईची गाणी फार चांगली येत होती , ती गायला लागली ..!

“ कुंभा काकडी, ..लावले
लाऊन झालं एक रोज.. .. लाऊन झालं दोन रोज ,
लाऊन झालं तीन रोज ॥ लाऊन झालं चार रोज
पाचव्या दिशी ,मोड दिसू लागलं .. ।
आलं एका पानांवरी । आलं दोन पानांवरी ,आलं तीन पानांवरी ,
कवळ्या फूल दिसू लागली , एक काकडी लागली । दोन काकडी लागली ,

https://www.gapbhasha.org/

कूभा.. काकडी तोंडली कुंभा काकडी तोंडली .............................. ।

अशा भुलई च्या तालात आम्ही अगदी आनंदी होऊन , पुरण खात उभा होतो .भुलईचा खेळ संपला आम्ही घराकडे निघालो .. माय आमची वाटच बघत होती, संध्याकाळ, झाली होती. दिवसभर .. दंगा मस्ती करून भूक ही लागली होती , आम्ही घरी गेलो हात पाय धुतलो .. आणी पूरण पोळीच्या ताटावर बसलो .. पोटात भूक लागली होती .. गप्पा गप .. जेवणावर ताव मारला आणी , एकदाच मन समाधान झाल .. मायच्या डोळ्यात अश्रु दिसू .. लागले .. माझ्या चिमण्याला किती भूक लागली होती , असल रोज माझ्या लेकरला मिळाल तर .. कसे वाण्या /बामनाच्या पोरावून भी, माझे लेकर चांगले दिसतील ..? म्हणून माय आम्हाला गळ्याला घालून रडू लागली .. मायच्या बोलण्याचा अर्थ आम्हाला काहीच कळला नव्हता .. पण मी जस जस मोठा होऊ लागलो तस तसा त्या बोलण्यातील अर्थ कळत गेला ..! प्रत्येक सणाला जीवाचा आटा पिटा करून लेकराला भरवणं मायला कठीण झाल होत ..

माझ्या लेकरला दररोज तीन टाइम तरी , चांगल खायला मिळत नाही .. हे मायच दुख होत म्हणून मायला " बऱ्याच दिवासानी मुलांच समाधानीच जेवण झाल म्हणून माय ला रडू कोसळल होत.

मुलाच्या तोंडावर समाधान पहावून मायच पोट भरल्यासारख वाटल ..! पंचमीचा सण झाला तो दिवस आमचा फार आनंदात गेला. समाधानाची मायला झोप लागली .. आम्ही भावंड पूरण पोळीच जेवण करून सुस्त झालो मायन पुरणपोळीचा घास भरवण्यासाठी अंगावर निंदणाचे पैसे उचल घेऊन आमचा सण साजरा झाला .. मायची माझ्या ही उक्ती सर्वांना चार घास भरवण्यासाठी होती .. नागपंचमीचा सण संपला .. पावसाणे ही चांगलीच उघाड दिलेली होती .. मायन नित्यनियमाने दररोजच्या कामाला लागली, सकाळ झाली की, घरातील आवराआवर करून सणांसाठी घेतलेली पैसे फेडण्यासाठी माय आणी संता आजी देशाईच्या वावराकडे निंदाय निघाले ..!

https://www.gapbhasha.org/